


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे    अंक : ६८६. वा    शनिवार    दि. १७ फेब्रुवारी २०२४    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# मराठा समाजाच्या आरक्षणावर मागासवर्ग आयोगाचा अहवाल सादर, निवडणुकीपूर्वी कायदा होणार?

**जनसंचलन/मुंबई**

राज्यातील मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोकरीत स्वतंत्र आरक्षण देण्याची शिफारस राज्य मागासवर्ग आयोगाने आपल्या अहवालात केली आहे. या शिफारशीच्या आधारे राज्य सरकार २० फेब्रुवारीला होणाऱ्या विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात विधेयक मांडून ते मंजूर करून घेणार आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी विधेयकाचे कायद्यात रूपांतर करून त्याची अंमलबजावणी करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे.मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या प्रक्रियेचा भाग म्हणून राज्य सरकारने मागासवर्ग आयोगामार्फत मराठा आणि खुल्या प्रवर्गातील घटकांचे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणाच्या माध्यमातून मराठा समाजाचे आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपण तपासण्यात आले. ही तपासणी पूर्ण झाल्यानंतर राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष आणि निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी शुक्रवारी सर्वेक्षणाचा अहवाल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुपूर्द केला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. यावेळी शिंदे यांनी आयोगासह संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा अशा साडेतीन ते चार लाख अधिकारी, कर्मचाऱ्यांनी विक्रमी वेळेत सर्वेक्षण केल्याबद्दल कौतुक केले. या सर्वेक्षणाबाबत मुख्यमंत्र्यांनी बैठका घेऊन युद्धपातळीवर हे सर्वेक्षण पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या.मराठा समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगामार्फत २३ जानेवारी २०२३ पासून राज्यात युद्धपातळीवर मराठा आणि खुला प्रवर्गाचे सर्वेक्षण करण्यात आले. हे सर्वेक्षण २ फेब्रुवारी रोजी पूर्ण करण्यात आले. राज्यातील अंदाजे अडीच कोटी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. या कामी गोखले इन्स्टिट्युट, आयआयपीएस या नामांकित संस्थांची मदत झाली. विशेष म्हणजे सॉफ्टवेअर प्रणालीच्या माध्यमातून हे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले. या कामकाजासाठी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगर पालिका आयुक्त यांना नोडल अधिकारी म्हणून नेमण्यात आले होते. तसेच राज्यातील जमीन अधिग्रहण, जमीन धारणा, जमाबंदी, भूमी अभिलेख, तसेच शासकीय आणि निमशासकीय नोकरीमध्ये समाजाचे प्रमाण तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रमाण आदी बाबींची प्रत्यक्ष माहिती मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील सर्व विभागांच्या सचिवांनी आयोगाला उपलब्ध करून दिली. तसेच शारीरिक कष्ट करणाऱ्या कामगारांची माहितीसुद्धा आयोगास उपलब्ध करून देण्यात आली. या व्यतिरिक्त राज्यात मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने मराठा तरुणांच्या आत्महत्यांविषयीची माहितीही आयोगाला देण्यात आली.मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य सरकारने मागासवर्ग आयोगाला सांगितले होते. साडेतीन ते चार लाख



लोक यासाठी दिवसरात्र काम करीत होते. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी केलेल्या प्रयत्नांनी मराठा आरक्षण उच्च न्यायालयात टिकले होते. मात्र, दुर्दैवाने सर्वोच्च न्यायालयात ते टिकू शकले नाही. आज सादर करण्यात आलेला अहवाल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडण्यात येऊन त्यावर चर्चा होईल, असे एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले.मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी अगदी पहिल्यापासून आम्ही सकारात्मक असून तशी पाऊले वेळोवेळी उचलली आहेत. आयोगाने विक्रमी वेळेत सर्वेक्षण पूर्ण केले असून मला विश्वास वाटतो की, कायद्याच्या चौकटीत बसणारे आणि टिकणारे असे आरक्षण ओबीसी किंवा इतर कुठल्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न बसता आम्हाला देता येईल, असेही शिंदे म्हणाले. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. आम्ही सत्तेवर आल्यापासून अनेक ठोस पावले उचलली आहेत. आयोगाने आज विक्रमी वेळेत आपला अहवाल सादर केला आहे. २० फेब्रुवारीला विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. हे सर्व पाहता आंदोलनकर्त्यांनी आपले आंदोलन मागे घ्यावे, असे आवाहन एकनाथ शिंदे यांनी यावेळी केले. यावेळी मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, आयोगाचे सदस्य अंबादास मोहिते, ओमप्रकाश जाधव, मच्छिंद्रनाथ तांबे, ज्योतीराम चव्हाण, मारुती शिंकारे, डॉ. गोविंद काळे, डॉ. गजानन खराटे, नीलिमा सरप (लखाडे), सदस्य सचिव आ. उ. पाटील आदी उपस्थित होते.




# कारची काच फोडून ९ लाख रुपये पळविले!

**जनसंचलन/मेहकर**

कामासाठी बँकेतून काढलेली एका शिक्षकाची ९ लाख रुपयांची रोख रक्कम दुचाकीवर आलेल्या दोघांनी कारची काच फोडून पळविल्याची घटना मेहकर तालुक्यातील देऊळगाव माळी येथे शुक्रवारी दुपारी घडली. दरम्यान याप्रकरणी मेहकर पोलिसांनी दोन अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला असून घटनेचा पुढील तपास पोलिस करत आहेत. मेहकर तालुक्यातील हिवरा आश्रम येथील शिक्षक संतोष मदनलाल लद्धड यांनी वैयक्तिक कामासाठी मेहकर येथील बँकेतून ९ लाख रुपये काढले होते. देऊळगाव माळी मार्गे हिवरखेड येथील आपल्या शाळेवर ते कारद्वारे (एमएच-२८-व्ही-४९०१) जात होते. दरम्यान सखाराम बळी व विश्वनाथ मगर या शिक्षकांचा त्यांना चहा घेण्यासाठी फोन आला असता देऊळगाव माळी येथे त्यांनी बसस्थानक जवळ कार लावत ते चहा घेण्यासाठी गेले. तेवढ्यात त्यांच्या कारचा पाठलाग करणाऱ्या दुचाकीवर आलेल्यांनी त्यांच्या कारची काच फोडून गाडीत ठेवलेली ९ लाख रुपयांची पिशवी घेऊन पलायन केले. स्थानिकांनी त्याची माहिती त्यांना



त्वरित दिले. मात्र तोवर चोरट्यांनी पलायन केले होते. याची माहिती पोलिस पाटील गजानन चाळगे यांनी मेहकर पोलिसांना दिली. त्यानंतर एसडीपीओ प्रदीप पाटील, मेहकरचे ठाणेदार राजेश शिंगटे यांनी घटनास्थळ गाठून परिसरातील सीसीटीव्ही फूटेज चेक केले.

# आयटीआयमध्ये गुरुवारी रोजगार मेळावा

**जनसंचलन/बुलडाणा**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत गुरूवार, दि. २२ फेब्रुवारी रोजी रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. याचा युवकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांतर्गत मॉडेल करियर सेंटर, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने पंडीत दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. रोजगार मेळाव्यात १३पेक्षा अधिक उद्योजकांनी त्यांच्याकडील १ हजार ३५ पेक्षा अधिक रिक्त पदे अधिसूचित केली आहे. या मेळाव्याद्वारे टाटा, व्हिल्स इंडिया लिमिटेड सारख्या नामांकित कंपनी प्रतिनिधीद्वारे गरजू व रोजगार इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यांची प्राथमिक निवड करणार आहे. यासोबतच जिल्ह्यातील उमेदवारांना कौशल्य विकास प्रशिक्षणाची संधी सुद्धा नि:शुल्क उपलब्ध करुन देण्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नाव नोंदणी असलेल्या अथवा नसलेल्या दहावी, बारावी, आयटीआय, पदवीधर उमेदवारांनी दि. २२ फेब्रुवारी २०२४ रोजी आवश्यक त्या कागदपत्रांसह सकाळी १० वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुलडाणा येथे प्रत्यक्ष उपस्थित राहावे. पात्र, गरजू व नोकरी इच्छुक उमेदवार शैक्षणिक पात्रतेच्या आधारे एकापेक्षा




जास्त पदाकरीता अर्ज करु शकतील. उमेदवारांनी उपस्थित राहुन नाव नोंदणी करावी आणि उपस्थित कंपन्यांच्या प्रतिनिधी समवेत मुलाखत द्यावी. जिल्ह्यातील उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, याबाबत अडचण आल्यास जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलडाणा या कार्यालयाच्या (०७२६२-२४२३४२) या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त प्र. वा. खंडारे यांनी केले आहे.

# अनुकंपाधारकांची सामायिक प्रतीक्षा सूची प्रसिद्ध

**जनसंचलन/बुलडाणा**




जिल्ह्याची सामाजिक प्रतीक्षा सूची प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीवर १५ दिवसांच्या आत आक्षेप नोंदवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे. अनुकंपाधारक उमेदवारांच्या सामायिक प्रतिक्षासूचीवर असलेल्या अनुकंपा उमेदवारांची दि. १ जानेवारी २०२४ रोजीची गट-क संवर्गाची जिल्हास्तरावरील तात्पुरती सामायिक प्रतिक्षा यादी अद्ययावत करण्यात आली आहे. सदर तात्पुरती सामायिक प्रतिक्षा सूची buldhana.nic.in या वेबसाईटवर, तसेच जिल्हा नाझर, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर यादीवर आक्षेप, हरकती असल्यास अनुकंपा उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रतेत वाढ करावयाची असल्यास, जात व जन्माचा रकाना निरंक असल्यास व इतर काही आक्षेप असल्यास आवश्यक माहितीसह यादी प्रसिद्ध झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत आक्षेप, हरकती लेखी स्वरुपात सादर करण्यात यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाने केले आहे.

# राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराच्या प्रवेशिका पाठविण्यासाठी २९ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

**जनसंचलन/बुलडाणा**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाजमाध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी दि. १ जानेवारी, २०२३ ते ३१ डिसेंबर, २०२३ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन, छायाचित्रे, वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका पाठवण्याची अंतिम दि. ३१ जानेवारी, २०२४ असा होता. तथापि, पत्रकारांच्या प्रोत्साहनासाठी प्रवेशिका स्विकारण्यासाठी २९ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार या स्पर्धेत जास्तीत जास्त पत्रकारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन माहिती व जनसंपर्क विभागाद्वारे करण्यात आले आहे. राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने dgipr.maharashtra.gov.in व maharshtra.gov.in तसेच . या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

# रस्ता सुरक्षा अभियानात वॉकेथॉन...

**जनसंचलन /बुलढाणा**

उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयातर्फे रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत गांधीभवन येथे वॉकेथॉन उत्साहात पार पडली. आमदार संजय गायकवाड यांनी वॉकेथॉनला हिरवी झेंडी दाखविली. यावेळी आमदार संजय गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुभाष राऊत, जिल्हा कोषागार अधिकारी ऋषिकेश वाघमारे, परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक अशोक वाडीभस्मे उपस्थित होते. आमदार गायकवाड यांनी नागरिकांनी संवेदनशीलपणे वाहन चालवावे. अपघात झाला असल्यास यात जखमींना मदत करावी. अपघातग्रस्त व्यक्तीला मदत केल्यास त्या व्यक्तीला कुठल्याही कायदेशीर कारवाईला तोंड द्यावे लागत नाही. तसेच रस्त्याने चालताना किंवा वाहन चालविताना नियम पाळणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी श्री. गायकवाड यांच्या हस्ते शेख मुज्जमत जब्बार, रा. मातणी आणि प्रेम वाकोडे रा. बेलोरा, पिंपळगाव राजा यांनी अपघातग्रस्त व्यक्तीला मदत केल्याबद्दल हेल्मेट देऊन सन्मानित केले. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रसाद गाजरे यांनी प्रास्ताविक केले. अनिल रिंढे यांनी सूत्रसंचालन केले. या वॉकेथॉनमध्ये सहकार विद्या मंदिर, महात्मा फुले शाळा, शिवाजी विद्यालय, जिजामाता महाविद्यालय एनसीसी कॅडेट, सैनिक प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी



यांच्यासह नागरीक सहभागी झाले. वॉकेथॉनच्या आयोजनासाठी सौरभ पवार, राजेंद्र निकम, विवेक भंडारे, सीमा खेते, नागनाथ महाजन, रितेश चौधरी, प्रतीक रोडे, स्वप्निल वानखेडे, भूषण खरतडे, अनुजा काळमेघ, सुरज कोल्हे, राजश्री चौधरी, प्रियंका काळे, सुरेखा सपकाळ, संतोष घ्याळ, गजानन तनपुरे यांनी पुढाकार घेतला.

# किसान कामगार संयुक्त औद्योगिक संपाला सीटूचा पाठिंबा-जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केले निदर्शने...

**जनसंचलन/बुलढाणा**

देशातील कामगार, कष्टकरी, शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी- कामगारांच्या संयुक्त कृती समितीने १६ फेब्रुवारी २०२४ रोजी संपूर्ण देशभर एक दिवशीय औद्योगिक संप पुकारला होता. या संपाला बुलढाणा जिल्हा सीआयटीयूच्या वतीने सिटूचे जिल्हा अध्यक्ष कॉ. पंजाबराव गायकवाड यांच्या नेतृत्वात बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आशा वर्कर्स, अंगणवाडी कर्मचारी संघटना, आणि शालेय पोषण आहार कामगारांच्या महिला कार्यकर्त्यांनी सरकारच्या जनविरोधी धोरणाच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करून निदर्शने केली. या आंदोलनाच्या मागण्यांचे निवेदन बुलडाण्याचे जिल्हाधिकारी किरण पाटील यांच्या मार्फत देशाचे पंतप्रधान आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना पाठविण्यात आले. आज देशात भाजप प्रणित मोदी सरकार आणि राज्यातील महायुतीचे शिंदे सरकार मोठ्या प्रमाणात शेतकरी व कामगार विरोधी धोरणे राबवून मुठभर भांडवलदारांच्या हिताचे धोरणे राबवीत आहे. देशात मोठ्या प्रमाणात महागाई आणि बेरोजगारी वाढत असताना सरकार जाती जातीमध्ये आणि धर्मा-धर्मामध्ये आरक्षणाच्या नावावर फोडाफोडीचे राजकारण करीत आहे. मूळ प्रश्नांना बगल देऊन परस्परांमध्ये विद्वेश निर्माण करून निवडणूका डोळ्यासमोर ठेवून मताची पोळी भाजत आहे. जीवनावश्यक वस्तूचे भाव गगनाला भिडलेले आहेत, शिक्षण आणि आरोग्यावरील खर्च सर्वसामान्य माणसाच्या आवाक्या बाहेर गेलेला आहे. शेतमालाला उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव मिळावा, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी व्हावी वीज विधेयक २०२० रद्द करण्यात यावे यासाठी देशातील शेतकरी गेल्या काही दिवसापासून केंद्र सरकारच्या विरोधात आंदोलन करीत आहे. तसेच देशातील सार्वजनिक उद्योग विक्रीला काढून त्याचे मोठ्या प्रमाणात खाजगीकरण केल्या जात आहे. जूने कामगार हिताचे कायदे रद्द करून ४ श्रमसंहिता मंजूर करून कामगारांवर मोठा अन्याय केला



जात आहे.राज्यातील आशा आणि अंगणवाडी कर्मचारी, शालेय पोषण आहार कामगार आपल्या मानधन वाढीसाठी संप करीत आहेत.सरकार त्यांच्या प्रश्नांवर चर्चा करायला सुद्धा तयार नाही. या जनविरोधी धरणाच्या विरोधात हा औद्योगिक संप करण्यात आला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी आज सिटूच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!


# जिजाऊ जन्मभूमीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त भव्य रॅलीचे आयोजन

जनसंचलन/ सिंदखेडराजा

अखंड हिंदुस्थानचे आराध्या दैवत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९४ वी जयंती निमित्त १९ फेब्रुवारी रोजी स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ आऊसाहेब यांच्या जन्मभूमीत आयोजक समिती तर्फे भव्य रथ मिरवणूक रॅलीचे नियोजन करण्यात आले आहे रथाचा मार्ग सकाळीं सेलू येथून ७ वाजता प्रारंभ होणार असुन भोसां, धांदरवाडी, दत्तापुर, वसंतनगर डावरगाव, नाईकनगर,अंचली नसिराबाद, माळ सावरगाव, सिंदखेड राजा डॉ कलकुंबे पाटील हाऊसप्तील दावाखाणा येथे शिवभक्तांना चहा व नाश्त्याची सोय केली आहे असुन शिवाजी महाराज नगर येथे प्रतिमेचे पूजन करुन ते राजमाता जिजाऊ आऊसाहेब यांच्या राजवाड्या पर्यंत




शिवाजी महाराज यांच्या स्मारकजवळ भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे संध्याकाळी ८ वाजता छत्रपती शिवजी महाराज स्मारक येथे पोवड्याचा कार्यक्रम होईल,आजू बाजूच्या गावातील सर्व शिवभक्त यांनी सकाळीं ६ वाजता सेलू येथे रॅलीत सहभागी होण्यासाठी हजर राहावे असे आवाहन छत्रपती शिवाजी महाराज जन्मोस्त्व समिती सिंदखेड राजा वतीने करण्यात आले आहे

# बुलडाणा येथील धनगर समाज आमरण उपोषण सर्व सामान्य समाज बांधवांच्या उपस्थितीत सुटले.




जनसंचलन/लोणार

धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे तत्काळ आरक्षण मिळावे या मागणीसाठी २९ जानेवारी पासुन बुलडाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर युवा समाज सेवक नंदुभाऊ लवंगे आमरण उपोषणाला बसले होते. या १७ दिवसात जिल्ह्यासह ,राज्यभरातून विविध समाज बांधव भेटी देवून या उपोषणाला जाहीर पाठिंबा देवुन गेले. प्रशासकीय विभागाने सर्वतोपरी मदत करून वारंवार अहवाल उच्च स्तरावर पाठवले पण, प्रतिसाद मिळाला नाही. तसेच महाराष्ट्रातील मोजक्याच राजकीय पुढाऱ्यांनी या उपोषणाला भेटी दिल्या पण ठोस निर्णय किंवा सकारात्मक पवित्रा घेतला नाही. यामुळे धनगर समाज बांधवांच्या मनात राजकीय पुढाऱ्यांनबद्दल रोष आहे. बुलडाणा जिल्ह्यात धनगर समाज बहुसंख्येने असुन, निर्णायक मतदान या समाजाचे आहे. गेल्या १७ दिवसात नंदुभाऊ लवंगे यांनी धनगर समाजाच्या अनुसुचित जमातीच्या आरक्षण अंमलबजावणीसाठी लोकशाही मार्गाने प्रयत्न केले. तब्येत बिघडत असताना जिल्ह्यातील सर्व तालुक्यामध्ये विविध ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. दोन वेळा बुलडाणा येथे लाक्षणिक उपोषण तसेच मोर्चा सुद्धा काढण्यात आला होता. कुणी टॉवरवर चढून शासनाचा निषेध करत होते तर काही तरुण बांधवांनी आत्मदहनाचा इशारा दिला होता, तसेच नंदुभाऊ लवंगे यांना सर्व समाज बांधवांनी विनंती केली होती की तुम्ही जर उपोषण सोडणार नसाल तर आम्ही विष प्राशन करू, आणि अनेक ग्रामस्थांनी स्वतः ही जेवण व पाणी घेणार नसल्याचे नमुद केले यावेळी सर्व सामान्य समाज बांधवांच्या भावना लक्षात घेऊन आपले आई वडील व उपस्थित समाज बांधवांच्या उपस्थितीत १४ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ६ वाजता हे उपोषण सोडण्यात आले. पण राजकीय पुढाऱ्यांनी आता पर्यंत धनगर समाजाचा मतांसाठी वापर केला आहे, याची जाणीव ठेवून महाराष्ट्रातील प्रत्येक मतदार संघात धनगर समाज स्वतः चा उमेदवार उभा करणार आहे. आणि यापुढेही विविध स्तरावर शांततेच्या मार्गाने हा लढा सुरू राहील असे नंदुभाऊ लवंगे यांनी जाहीर केले.

# अवकाळीने खचलेल्या शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचले संदीप शेळके!

## शेतकऱ्यांना स्पेशल मदतीचे पॅकेज देण्याची मागणी; म्हणाले, शेतकऱ्यांना सन्मानाने जगता येईल अशी धोरणे आखण्याची गरज!

जनसंचलन/ शेगाव

खरीप हंगामात दुष्काळामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले. सोयाबीन कापसाचे उत्पादन तर घटलेच शिवाय भाव पडल्याने उत्पन्न देखील घटले, शेतकऱ्यांच्या हातात खर्च वजा जाता दमडी देखील उरली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना रब्बी हंगामातून अपेक्षा होती, मात्र रब्बी हंगामात देखील अवकाळी पाऊस आणि गारपीटीने शेतकऱ्यांची दैना उडाली आहे. त्यामुळे मायबाप शेतकऱ्यांच्या अडचणीचा विचार करून सरकारने तातडीने स्पेशल पॅकेज ची घोषणा करावी अशी मागणी वन बुलडाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी केले. वन बुलडाणा मिशनच्या परिवर्तन रथयात्रेच्या निमित्ताने संदीप शेळके सध्या शेगाव तालुक्याच्या दौऱ्यावर आहेत, आज,१६ फेब्रुवारीला सायंकाळी शेगाव तालुक्यातील सांगवा येथील सभेत बोलतांना संदीप शेळके यांनी उपरोक्त मागणी केली. त्याआधी संदीप शेळके यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करीत शेतकऱ्यांना धीर दिला. पुढे बोलतांना संदीप शेळके म्हणाले, दुष्काळाची आणि पीक विम्याची रक्कम देखील अजून अनेक शेतकऱ्यांना मिळाली नाही. त्यातच आता अवकाळी पाऊस आणि गारपीटीने मोठे नुकसान झाले, शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली तेव्हा झोपलेला गहू पाहून मन सुन्न झाल्याचे संदीप शेळके म्हणाले. शेतकऱ्यांना केवळ सन्मान निधी देऊन चालणार नाही तर शेतकऱ्यांना सन्मानाने जगता येईल अशी धोरणे आखण्याची गरज असल्याचे संदीप शेळके यावेळी म्हणाले.. वन बुलडाणा मिशन ही राजकीय लोकचळवळ जिल्ह्याच्या विकासासाठी सुरू केल्याचे सांगत जिल्ह्याचा मागासलेपणाचा कलंक पुसायचा असल्याचे संदीप शेळके म्हणाले. रोजगार,शिक्षण, दळणवळण, आरोग्य, पर्यटन, महिला सशक्तीकरण या सर्वच विषयावर आपला बुलडाणा जिल्हा अग्रक्रमावर न्यायचा



आहे, त्यासाठी राजकीय परिवर्तनाची आवश्यकता असल्याचे संदीप शेळके म्हणाले. यासाठीच जनतेच्या म्हणण्यानुसार आगामी लोकसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असून जनतेने आता परिवर्तनाचा निर्धार पक्का केल्याचे संदीप शेळके म्हणाले.. परिवर्तन रथयात्रेच्या दुसऱ्या टप्प्याच्या दुसऱ्या दिवशी ही यात्रा शेगाव तालुक्यातील कालवड, भास्तन, चिंचखेड, संगोडा, डोलारखेड, माटरगाव, बेलुरा, निंबी, जलंब स्टेशन, जलंब, पहुरजीरा, कुरखेड, एकफळ, आळसना, सांगवा, तिव्हान बु, तिव्हान खु, टाकळी धारव व शेवटी मुक्कामी जानोरी या गावी पोहचली. सर्वच गावांत या यात्रेला उदंड प्रतिसाद मिळाला..

# मंगळवारपासून चिखलीत रंगणार महासंस्कृती महोत्सव...

## तीन दिवस सांस्कृतिक कार्यक्रम,कवी संमेलन, लोककलांचा उत्सव

जनसंचलन/बुलडाणा

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने चिखली येथील तालुका क्रीडा संकुल येथे तीन दिवसीय महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन मंगळवार, दि. २० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. या तीन दिवसीय महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमासह कवी संमेलन, लोककलांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. यावेळी पालकमंत्री दिलीप वळसे पाटील, वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार, खासदार प्रतापराव जाधव, रक्षा खडसे, आमदार किरण सरनाईक, वसंत खंडेलवाल, धीरज लिंगाडे, डॉ. राजेंद्र शिंगणे, डॉ. संजय कुटे, संजय रायमुलकर, संजय गायकवाड, ॲड. आकाश फुंडकर, राजेश एकडे, श्वेता महाले, सांस्कृतिक कार्य विभागाच्या सचिव जयश्री भोज, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, जिल्हा पोलिस अधीक्षक सुनिल कडासने, सांस्कृतिक कार्य





संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे आदी उपस्थित राहतील. चिखली येथे मंगळवार, दि. २० फेब्रुवारी रोजी ढ्गनक्षत्रांचे देणफ कार्यक्रमात गायक ऋषिकेश रानडे आणि आनंदी जोशी हे सुधीर फडके आणि आशा भोसले यांची मराठी, हिंदी गाणी सादर करतील. बुधवार, २१ फेब्रुवारी रोजी ढ्जागर लोक कलेचाफ कार्यक्रमात पारंपरिक दंडार, भारुड, गोंधळ, पोवाडा, वासुदेव या लोककला सादर करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्रातील नामांकीत कवींचे कवी, हास्यकवी संमेलन होईल. त्यानंतर दीप्ती आहेर आणि समूह पारंपरिक लावणी सादर करतील. गुरुवार, २२ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राची लोकधारा या महाराष्ट्राची संस्कृती दर्शविनारा कला आविष्कार अनिरुद्ध जोशी आणि सहकलाकार सादर करतील. तसेच गौरी थोरात ह्या राजमाता जिजाऊसाहेब यांच्या जीवनावर आधारित एकांकिका सादर करतील. तसेच दि. २० ते २२ फेब्रुवारी २०२४ दरम्यान सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत चिखली येथील परमहंस रामकृष्ण मौनी बाबा संस्थान येथे स्थानिक लोकांच्या कलागुणाचा प्रोत्साहनात्मक कार्यक्रम भजन मेळावा आयोजित करण्यात आला आहे. याशिवाय कार्यक्रमाच्या ठिकाणी बचतगटांच्या स्टॉल्सच्या खाद्य संस्कृतीचे आयोजन करण्यात आले आहे. महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन संस्कृतीचे आदान-प्रदान करण्यासाठी आयोजित करण्यात आला आहे. याठिकाणी नागरिकांनी विनामूल्य प्रवेश दिला जाणार आहे. नागरिकांनी सांस्कृतिक आणि लोककलाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# वडिलांची आईला मारहाण, मुलाला राग अनावर, सततच्या भांडणाला कंटाळून धक्कादायक कृत्य...

वृत्तसंस्था/अमरावती

आईला मारहाण केल्याचा राग अनावर झाल्याने मुलाने वडिलांवर लोखंडी बत्त्याने हल्ला चढवून त्यांची हत्या केली. ही धक्कादायक घटना भातकुली ठाण्याच्या हद्दीतील सायत येथे घडली. या प्रकरणी आरोपी मुलास अटक करण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, राजेश श्रीराम मिसाळ (६०) रा. सायत असे मृतक वडील तर अंकुश राजेश मिसाळ (२९) रा. कोकर्डा असे आरोपी मुलाचे नाव आहे. राजेश हे नेहमी पत्नीसोबत वाद घालून तिला मारहाण करीत होते. सोमवारीसुद्धा त्यांनी पत्नीला मारहाण केली. ही बाब दर्यापूर तालुक्यातील कोकर्डा येथे आजीकडे राहणारा मुलगा अंकुशला कळली. वडिलांनी आईला मारहाण केल्याचा राग अनावर झाल्याने अंकुशने थेट सायत गाठले.घरी पोहचताच त्याने वडील राजेश यांना त्याचा जाब विचारला. या कारणावरून दोघांत वाद झाला. या वादात अंकुशने वडील राजेश यांच्या डोक्यावर लोखंडी बत्त्याने हल्ला चढविला. त्यात गंभीर जखमी झालेल्या राजेश यांचा जागीच मृत्यू झाला. याबाबत माहिती मिळताच भातकुली पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. मृतदेहाला शवविच्छेदनासाठी




रुग्णालयात पाठविण्यात आले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मुलगा अंकुशविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. पुढील तपास ठाणेदार प्रवीण वांगे यांच्या मार्गदर्शनात सुरू आहे.

# गारपिटी व चक्री वादळामुळे झालेल्या नुकसानाचा पंचनामा करून तात्काळ शेतकऱ्यांना मदत द्या

जनसंचलन/नांदुरा

तालुक्यातील ग्राम वाडाळी, वडगांव ,धानोरा,वसाडी,वळती यांसह आजूबाजूच्या गावांत काल दिनांक १५ फेब्रुवारी रोजी रात्री वादळी वाऱ्यासह गारपिटीमुळे गहू,मका,कांदा,हरभरा,ज्वारी व फळबाग यांसह जवळपास सर्वच शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.अचानक आलेल्या या चक्री वादळामुळे व गारपिटीने शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे.आधीच शेतकरी कर्जाच्या बोझ्याखाली दबलेला असून शेतमालाला भाव नसल्याने आर्थिक संकटात सापडला आहे.अशातच निसर्गाच्या लहरीपणामुळे काल झेलेल्या चक्री वादळाचा व गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे पूर्ण पीक झोपून गेले यामुळे



शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करून दिरंगाई न करता शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्या अशी मागणी आज १६ फेब्रुवारी रोजी संभाजी ब्रिगेड नांदुराच्या वतीने नांदुरा तहसीलदार यांच्याकडे केली असता तहसीलदार साहेबांनी तात्काळ संमधित अधिकाऱ्यांना पंचनामा करण्याचे आदेश दिले आहेत.तरी शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळेपर्यंत पाठपुरावा करणार असल्याचे अमर पाटील यांनी सांगितले.यावेळी संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

# रविकांत तुपकरांच्या अटकेच्या निर्णयावर आता २१ फेब्रुवारीला फैसला...

जनसंचलन/बुलडाणा

आंदोलनातील गुन्ह्यात रविकांत तुपकरांना दिलेला जामीन रद्द करून त्यांना तुरुंगात ठेवावे अशी मागणी, पोलिसांनी जिल्हा न्यायालयाकडे केलेली आहे. तुपकरांना पुन्हा जामीन मिळतो की, तुरुंगात जावे लागते यावर आता २१ फेब्रुवारी रोजी फैसला होणार आहे. याप्रकरणी न्यायालयात १६ फेब्रुवारी रोजी न्यायालयात पुन्हा एकदा दोन्ही पक्षांनी जोरदार युक्तिवाद केला. त्यानंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला असून २१ फेब्रुवारी रोजी नेमका काय निकाल लागतो याकडे संपूर्ण जिल्हावासीयांचे लक्ष लागून आहे.

सोयाबीन कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी रविकांत तुपकरांनी आजवर विविध आंदोलने केली आहेत, हे संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. याच दरम्यान रेल्वेरोक पार्श्वभूमीवर आंदोलन होण्यापूर्वीच पोलिसांनी रविकांत तुपकरांना अटक केली होती. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५१ (३) अन्वये १८-०१-२०२४ रोजी तुपकरांना अटक करून १९-०१-२०२४ रोजी मा.न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी बुलडाणा यांचे समक्ष हजर करून तुरुंगात पाठविण्याची मागणी केली होती. न्यायालयाने उभय पक्षांचे युक्तिवाद ऐकून पोलिसांची विनंती फेटाळून लावली व तुपकर यांची मुक्तता केली होती. त्या आदेशांविरोधात बुलडाणा शहर पोलिसांनी जिल्हा सत्र न्यायालय बुलडाणा येथे पुनरनिरीक्षण अर्ज दाखल केला आहे. तसेच त्यामध्ये तुपकरांच्या इतर आंदोलनाच्या गुन्ह्यांचा संबध जोडून त्यांना अटकेत ठेवण्याची मागणी केली आहे. याप्रकरणी यापूर्वी ७ व ८ फेब्रुवारी रोजी सुनावणी झाली. त्यावेळी रविकांत तुपकर स्वतः न्यायाधीशांच्या समोर हजर झाले होते. तर त्यांच्यावतीने त्यांच्या सुविद्य पत्नी ॲड.शर्वरी तुपकर यांनी न्यायालयासमोर बाजू मांडली. दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवत १५ फेब्रुवारी रोजी अंतिम सुनावणी ठेवली होती. न्यायालयाचा निकाल काहीही येऊ शकतो. वेळप्रसंगी आपल्याला तुरुंगात जाण्याची वेळ सुद्धा येऊ शकते त्यामुळे रविकांत तुपकर यांनी १५ फेब्रुवारी रोजी निर्धार मेळाव्यात कार्यकर्त्यांशी संवाद साधत आपल्या भावना मोकळ्या केल्या. निर्धार मेळाव्याला अपेक्षेपेक्षा खूप मोठा प्रतिसाद मिळाला. तुपकरांचे समर्थक व सर्वसामान्य नागरिकांची प्रचंड गर्दी या मेळाव्यात दिसून आली. ही सर्वसामान्य जनता हीच आपली खरी संपत्ती आणि आपली खरी ताकद आहे. त्यामुळे आता तुरुंगात जाण्याची भीती नाही तुरुंगात गेलो तरी तुरुंगातून खासदारकीचा अर्ज भरणार आणि तुम्हा सर्वांच्या आशीर्वादाने लोकसभा निवडणूक लढणार असा निर्धार यावेळी रविकांत तुपकर यांनी व्यक्त केला. तर उपस्थित हजारो कार्यकर्त्यांनी व सर्वसामान्य नागरिकांनी देखील रविकांत तुपकर यांना आपण तन मन धनाने त्यांच्या पाठीशी असल्याचे सांगितले. या मेळाव्यानंतर रविकांत तुपकर न्यायालयात हजर झाले होते, परंतु तुपकरांच्या वतीने वकील



ॲड. शर्वरी तुपकर यांनी दाखल केलेल्या कायदेशीर पुराव्यावर युक्तिवाद करण्यासाठी सरकारी पक्षाने वेळ मागितल्याने प्रकरणाची सुनावणी १६ फेब्रुवारीला ठेवण्यात आली. त्यानुसार रविकांत तुपकर पुन्हा न्यायालयात हजर झाले होते. न्यायालयात दोन्ही पक्षांनी पुन्हा जोरदार युक्तिवाद केला. दोन्ही पक्षाचा युक्तिवाद न्यायालयाने ऐकून घेतल्यानंतर निकाल राखून ठेवला आहे. २१ फेब्रुवारी रोजी या प्रकरणाचा अंतिम निकाल जाहीर होणार आहे. रविकांत तुपकर यांना जामीन मिळणार की तुरुंगात जावे लागणार, यासाठी आता सर्वांना २१ फेब्रुवारी पर्यंत वाट पाहावी लागणार असून या निकालाची संपूर्ण राज्याला उत्सुकता लागून आहे.

# संत सेवालाल यांचे विचार नीतीमूल्य व आधुनिकतेची शिकवण देणारे-डॉ. गोपलसिंह बच्छीरे...

जनसंचलन/ लोणार

संत सेवालाल महाराजांचे विचार नीतीमूल्य जोपासणारे, आधुनिकता व साक्षरतेकडे नेणारे असे वक्तव्य प्राध्यापक डॉक्टर गोपालसिंह बच्छीरे यांनी आपल्या भाषणात केले.

गायखेड येथे संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त संत सेवालाल महाराज सभागृहात प्रा. डॉ.गोपाल बच्छीरे यांचे व्याख्यानाचे आयोजन केले होते, पुढे बोलताना डॉ. बच्छीरे म्हणाले सेवालाल महाराजांनी सतराव्या शतकात समाजास उन्नत करण्यासाठी सात वचने व बावीस प्रमुख तत्वे सांगितली त्यातून फक्त बंजारा समाजाचा विकास नव्हे तर संपूर्ण देशाचा नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक व आर्थिक विकास होऊ शकतो, म्हणून संत सेवालाल महाराजांचे विचार समाजासाठी प्रेरणादायी आहेत.

या कार्यक्रमास राष्ट्रीय काँग्रेसचे तालुकाप्रमुख राजूभाऊ मापारी, शिवसेनेचे संतोष मापारी, सरपंच शालिग्राम घायाळ, काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष पुरुषोत्तम घायाळ, हे उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन गोविंदराव राठोड, शांतीलाल चव्हाण, ज्योतीताई



राठोड, अहिल्याबाई राठोड, राधाबाई राठोड, बन्सी चव्हाण, सुभाष राठोड, रामा राठोड, कैलास चव्हाण, रामराव चव्हाण, शेषराव पवार, भिकाजी जाधव यांनी केले होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुरुषोत्तम घायाळ यांनी केले तर आभार शालिग्राम घायाळ यांनी मानले.

# हातावर तलवार मारुन जखमी केले

जनसंचलन/खामगाव

हातावर तलवार मारुन जखमी केले क्षुल्लक कारणावरुन वाद घालून इसमास तलवार मारुन जखमी केल्याची घटना स्थानिक बाळापुर फैल भागात घडली. याबाबत गौतम बाबुराव गवई (५५) रा. बाळापुर फैल यांनी शहर पोस्टेला तक्रार दिली की, माझ्या घरासमोर आरडा-ओरड करु नका असे म्हटले असता विकास दाभाडे याने घरी जावून तलवार आणली व गवई यांच्या हातावर मारुन जखमी केले. तसेच करण दाभाडे, आकाश दाभाडे व




मनकर्णा दाभाडे यांनी देखील वार घालून मारहाण केली व शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. या तक्रारीवरुन पोलिसांनी उपरोक्त चौघांविरुध्द कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ भादविनुसार गुन्हा दाखल केला आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958